Publication: Mahasagar
Edition: Nagpur

Date: Wednesday, 4th June, 2014

# इंडियाफर्स्ट लाईफच्या महाराष्ट्रातील आक्रमक विकास योजनेला सुरूवात

मुंबई, जून ४,:देशातील सर्वात तरूण जीवन विमा कंपनी इंडियाफर्स्ट लाईफने आपल्या दीर्घकालीन विकास धोरणाचा भाग म्हणून राज्यातील आपली उपस्थिती वाढवण्यासाठी योजनांची घोषणा केली. आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये वर्षागणिक २० टक्के विकासाचे ध्येय कंपनीने राखले आहे.

लोकसंख्येच्या बाबतीत भारतातील दुसरा क्रमांक असलेले राज्य महाराष्ट्र ही आमच्यासाठी सुरूवातीपासूनच अतिशय महत्त्वाची बाजारपेठ राहिलेले आहे. औद्योगिक केंद्र समजले जाऊनसुद्धा आजही महाराष्ट्रातील मोठी लोकसंख्या कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. अशा ह्या संमिश्र परिस्थितीमुळे आम्हांला आव्हानात्मक संधी उपलब्ध होतात. असे इंडियाफर्स्ट लाईफच्या विक्री विभागाचे संचालक श्री.कमलाकर साई म्हणाले.

कंपनीने आतापर्यंत ९.४२ लाख ग्राहकांना विम्याचे कवच प्रदान केले असून सुरूवातीपासून सुमारे ८८१ करोड रूपयांचा व्यवसाय महाराष्ट्रातून प्राप्त केला आहे.

श्री.साई पुढे असेही म्हणाले, राज्यातील आमचा परिवार आणि बळकट उपस्थिती हे आमच्यासाठी अतिरिक्त फायदेकार आहेत. आज आम्ही ५७६ बँक ऑफ बडौदा आणि आंध्रा बँक शाखांच्या माध्यमातून उपस्थित आहोत.

इंडियाफर्स्ट लाईफने आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये २८ टक्के विकासासह आणखी एका यशस्वी वर्षाची नोंद केली. त्यांनी २७ लाखाहून अधिक जीवांना विम्याचे संरक्षण प्रदान केले असून आर्थिक वर्ष २०१३-२०१४ च्या अखेरीस यांच्याकडे ६५०० करोड रूपयांची संपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत (AUM - Assets Under Management) होती.

कंपनीने नेहमीच तंत्रज्ञानाचा अभिनव वापर करण्याचा प्रयत्न केलेला असून त्यातून ते ग्राहकांना खरोखरीच 'डिलाईट' करतात. डिमटेरियलाईज्ड प्रकारात पॉलिसी प्रदान करणाऱ्या काही पहिल्या कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडियाफर्स्ट लाईफने मॅजिकबोर्डच्या माध्यमातून ऑर्नदिस्पॉट पॉलिसी जारी करणे, इन्स्टंट २-स्वाईप हेल्थ क्लेम कार्ड, पर्सनलाईज्ड पिक्चर पॉलिसी पॅक्स इत्यादी उपक्रमांचीही सुरूवात केली आहे.

A Joint Venture of
Bank of Baroda
Legal & General
Andhra Bank